
यशाचा PASSWORD | शिर्डीच्या साई-कारभाऱ्यांना कोर्टाचा प्रसाद

सदा अग्रेसर साप्ताहिक

# चित्रलेखा

२ एप्रिल २०१२ | ₹ १०



## गांधीतीर्थ

### भंवरलाल जैन निर्मित जळगावात इंटरनॅशनल म्युझियम

CHITRALEKHA
NO.1
WEEKLY IN MARATHI

चित्रलेखा
www.chitralekha.com
CHITRALEKHA GROUP C

संस्थापकः वजु कोटक
सहसंस्थापकः मधुरी कोटक

मार्गदर्शकः
हरकिसन महेता

चेअरमनः
मौलिक कोटक

संपादकः
ज्ञानेश महाराव

कला विभागप्रमुखः
देवेंद्र बंतपेल्लीवार

दि. २-४-२०१२
वर्षः २३ अंकः ३२
■ सलग अंकः ११७१

प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहारः
'चित्रलेखा', २२, अंधेरी इंडस्ट्रियल इस्टेट, वीरा देसाई रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०० ०५३.
PHONE: 66921692
FAX: (022) 2673 0858

मुद्रक-प्रकाशकः मित्रजित भट्टाचार्य
'चित्रलेखा'तर्फे; प्लॉट नं.इ.एल-२ इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी महापे, नवी मुंबई

मालकः चित्रलेखा

■ MEMBER: INS
जाहिरात विभागः
६२, वजु कोटक मार्ग, मुंबई-१.
PHONE: 4034 7777
FAX: (022) 2261 5895

E-MAIL:
marathieditor@chitralekha.com
subscribe@chitralekha.com
advertise@chitralekha.com

■ *चित्रलेखातील मजकूर आणि फोटोंचे पुनर्मुद्रण पूर्वपरवानगी शिवाय करू नये.* - *संपादक*

वितरण विभागः
टपालाद्वारे अंकः वार्षिक वर्गणी (दिवाळी अंकासह) रु. ५३५/-
■ विदेशात रु. ३३८०/-
■ 'चित्रलेखा'च्या नावे पाठवलेली म. ऑ. आणि डिमांड ड्राफ्टच स्वीकारले जातील.
संपर्कः 022-66998316
022-67309898 Ext-25/72

# अ | नु | क्र | म





**१८** मुखपृष्ठकथा

## गांधीजींचं जागतिक दर्शन

असत्य आणि हिंसेने बरबटलेल्या आजच्या दुनियेला नवी दिशा देण्याचं बळ गांधीजींच्या विचारांमध्ये आहे या विश्वासाने जैन इरिगेशन ग्रुपने जळगावमध्ये गांधी रिसर्च फाउंडेशनच्या माध्यमातून गांधीतीर्थ हे एक अद्वितीय संशोधन केंद्र, प्रदर्शनस्थळ उभारलं आहे. या 'गांधीतीर्थ'मुळे जळगावचं नाव जगाच्या नकाशावर कायमचं कोरलं जाईल, इतकं ते भव्य-दिव्य आहे.

**२८** लक्षवेधी

## एकवीराआईची वेब पालखी

कार्ला-लोणावळा येथील एकवीरा देवस्थानच्या अनंत तरे यांच्या अध्यक्षतेखालील विश्वस्त मंडळाने आपलं सेवाभावी कार्य राष्ट्रपतींच्या हस्ते जगभर पोहोचवलंय.

**चित्रलेखा प्रियदर्शिनी**



**३१** विश्वचषक प्राप्तीची 'अभिलाषा'पूर्ती

**३४** सौंदर्यः उन्हाचा त्रास वाळ्याचा उपाय

**३५** सेलिब्रिटी डिशः साधंसुधं हेल्दी खाणं

**याशिवाय**
प्रबोधन, आजकाल
मर्मभेद, राजधानी, वादग्रस्त
किती हसाल!
जस्ट एक मिनिट, बतावणी
यशाचा पासवर्ड... करियर
उद्योग, नोकरी, जगाची बात
फिल्मरंग, मसाला पान आणि
५००० रुपयांच्या बक्षिसांचे शब्दकोडे

■ कीर्तिकुमार शिंदे (जळगाव)

# गांधीतीर्थ


## गांधीजींचं जागतिक दर्शन

**असत्य आणि हिंसेने बरबटलेल्या आजच्या दुनियेला नवी दिशा देण्याचं बळ गांधीजींच्या विचारांमध्ये आहे या विश्वासाने जैन इरिगेशन ग्रुपने जळगावमध्ये गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या माध्यमातून गांधीतीर्थ हे एक अद्वितीय संशोधन केंद्र, प्रदर्शनस्थळ उभारलं आहे. या 'गांधीतीर्थ'मुळे जळगावचं नाव जगाच्या नकाशावर कायमचं कोरलं जाईल, इतकं ते भव्य-दिव्य आहे. त्याचं २५ मार्चला राष्ट्रपतींच्या हस्ते उद्घाटन होत आहे, त्यापूर्वी 'गांधीतीर्थ'ला प्रत्यक्ष भेट देऊन लिहिलेला हा सचित्र रिपोर्ट.**

रखरखत्या उन्हासाठी प्रसिद्ध असलेल्या जळगावमध्ये पाहाण्यासारखं काहीच नाही, असं नेहमी म्हटलं जातं. त्यातल्या त्यात केळ्यांच्या बागा, सोन्याच्या व्यवहारांचं एक प्रमुख केंद्र आणि *जैन इरिगेशन ग्रुप* ही जळगावची ओळख. तरीही काहीतरी खास पाहाण्यासाठी म्हणून पर्यटनाच्या दृष्टीने जळगावला भेट द्यावी, असा विचार कधी कुणाच्या मनात येत नाही. पण लवकरच ही स्थिती बदलणार आहे. ख्यातनाम उद्योगपती, *ठिबक सिंचनाचे* प्रसारक भवरलाल जैन यांच्या *जैन इरिगेशन ग्रुपने* जळगावमध्ये उभारलेल्या 'गांधीतीर्थ'-*गांधी रिसर्च फाऊंडेशनमुळे* जळगावचं नाव केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे, तर देश व जागतिक पातळीवर येणार आहे.

जळगावच्या *जैन हिल्सच्या* टेकड्यांवरील चार हजार एकरच्या हिरव्यागार परिसरात तब्बल ६५ हजार चौरस फूट क्षेत्रफळ आकाराचं 'गांधीतीर्थ' साकारलं आहे. महात्मा गांधीजींशी संबंधित असलेल्या सर्वच वस्तू एका छताखाली उपलब्ध करून देण्यासाठी हा प्रकल्प





'गांधीतीर्थ'च्या माध्यमातून 'समग्र गांधी दर्शन' घडवण्याचा भंवरलाल जैन यांचा मानस आहे.


साकारण्यात आला आहे. हा प्रकल्प साकारण्यासाठी सुमारे तीस कोटी रुपयांहून अधिक खर्च करण्यात आले. पण हा खर्च काही केवळ भपका करण्यासाठी किंवा एखाद्या इव्हेंटसाठी केलेला नाही, तर त्यामागे एक ठाम भूमिका, विचार आहे.

'गांधीतीर्थ' उभारण्यामागची भूमिका स्पष्ट करताना *जैन इरिगेशन ग्रुप*चे अध्यक्ष व *गांधी रिसर्च फाऊंडेशन*चे संस्थापक डॉ.भंवरलाल जैन *चित्रलेखा*शी बोलताना म्हणाले, 'माझ्या संपूर्ण जीवनावर गांधीजींच्या विचारांचा, त्यांच्या कार्याचा व पद्धतींचा प्रभाव आहे. जैन धर्मात माझा जन्म झाल्याने *सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य, अपरिग्रह* या सिद्धान्तांशी माझा परिचय होताच. गांधीजींवरही भगवान महावीर यांचा प्रभाव होता. पण हे सर्व गुण जेव्हा गांधीजींच्या ठायी मला दिसले, तेव्हा मी आणखीन भारावून गेलो. गांधीजींच्या या प्रभावामुळेच त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मला असं काही तरी करायचं होतं ज्याद्वारे त्यांचं जीवन, विचार आणि कार्य यांच्या स्मृती चिरंतन जतन होतील. *गांधी रिसर्च फाऊंडेशन*चं 'गांधीतीर्थ' हे या विचारांतूनच आकाराला आलं.'

गांधीजींशी संबंधित सर्व साहित्य संकलित करण्याचा संकल्प केल्यानंतर भंवरलालजी यांचा *शोध महात्म्या*चा सुरू झाला. साबरमती, वर्धा, दिल्ली यांसारख्या गांधीजींच्या वास्तव्याने पवित्र झालेल्या जागांना त्यांनी भेटी दिल्या. २००४च्या सुरुवातीला ते दिल्लीतल्या *महात्मा गांधी राष्ट्रीय संग्रहालयात* गेले. या संग्रहालयात गांधीजींनी लिहिलेलं तसंच त्यांच्यावर लिहिलेलं बरंच महत्त्वपूर्ण साहित्य त्यांना आढळलं. हे साहित्य विकत घ्यायला त्यांनी सुरुवात केली. गांधी विचारांवरील कायमस्वरूपी कामासाठी भंवरलालजींनी *गांधी रिसर्च फाऊंडेशन*ची स्थापना केली. ज्येष्ठ गांधीवादी न्या.चंद्रशेखर धर्माधिकारी या फाऊंडेशनचे चेअरमन, तर डॉ.डी.आर.मेहता व अशोक जैन हे संचालक आहेत.

गांधीजींचं साहित्य गोळा करतानाच हे *गांधीतीर्थ* दिसायलाही आकर्षक व टिकाऊ असेल याकडे भंवरलालजी यांनी लक्ष दिलं. पण त्यात भंवरलालजींचे ज्येष्ठ पुत्र, *जैन ग्रुप*चे उपाध्यक्ष व गांधी *रिसर्च फाऊंडेशन*चे संचालक अशोक जैन यांनीही लक्ष घातलं. 'गांधीतीर्थ'चं डिझाइन व उभारणी करण्याची जबाबदारी त्यांनी दिल्लीत राहाणारे ख्यातनाम आर्किटेक्ट मृदूल व शिरीष बर्वे यांच्यावर सोपवली. पुढची किमान ३०० वर्षं हे 'गांधीतीर्थ' व त्याची इमारत सुरक्षित राहावी याची काळजी हा प्रकल्प उभारताना घेण्यात आली आहे. त्यासाठी खास राजस्थानहून जोधपूरचा *गुलाबी दगड* आणण्यात आला. पारंपरिक पद्धतीने चुन्याचा वापर करण्यात आला व विशेष म्हणजे, राजस्थानी कारागिरांनीच ही इमारत उभारलीय. जळगावच्या रखरखत्या उन्हापासून ही वास्तू तापू नये व त्यामुळे इथे येणाऱ्या अभ्यासकांना उष्म्याचा त्रास होऊ नये, यासाठी एकाच भिंतीच्या दोन बाजूंमध्ये मोकळी जागा ठेवण्यात आल्याचं अशोक जैन यांनी सांगितलं.

'गांधीतीर्थ'ची रचना अत्यंत विचारपूर्वक केली आहे. पावलापावलावर याचा प्रत्यय येतो. इथले *मोहन ते महात्मा* हे प्रदर्शन तर माहितीपूर्ण आहे. 'गांधीतीर्थ'मध्ये प्रवेश केल्यानंतर उजव्या बाजूने त्यांच्यावरील प्रदर्शनला सुरुवात होते. पण हे सर्वसाधारण प्रदर्शन नाही. हे प्रदर्शन प्रभावी व परिणामकारक व्हावं यासाठी चित्र, फोटो, वस्तू तसंच प्रकाश व ध्वनी योजनेचा अत्यंत सुंदर उपयोग करण्यात आला आहे. या प्रदर्शनाच्या पहिल्याच दालनात गांधीजींच्या काळातील गुजरातचं चित्र उभारण्यात आलं आहे. लहानपणीचे गांधीजींचे फोटो, त्यावेळी *पोरबंदर* कसं होतं हे दर्शवणारे फोटो, भिंतींवर गुजरात शैलीतील चित्रं साकारण्यात आली आहेत. तर *बॅरिस्टर* होण्यासाठी गांधीजी जेव्हा ब्रिटनला गेले, तेव्हा तिथलं युरोपियन वातावरण, रूम्सची रचना व फर्निचर यांच्या प्रतिकृती पाहाताना अक्षरश: त्या काळात गेल्याचा भास निर्माण होतो. दक्षिण आफ्रिकेत ज्या ट्रेनमधून गोऱ्या सैनिकांनी कृष्णवर्णीय म्हणून गांधीजींना बाहेर काढलं, त्या ट्रेनच्या डब्याची प्रतिकृतीही इथे पाहायला मिळते. त्याचबरोबर त्या त्या प्रसंगाची माहिती देणारे फोटो पाहून व मजकूर वाचून तत्कालीन राजकीय परिस्थितीची अचूक माहिती मिळते. खटकणारी बाब इतकीच की, 'गांधीतीर्थ'मधील संपूर्ण माहितीचा मजकूर हा केवळ *इंग्रजी* व *हिंदी* भाषेतच आहे. आंतरराष्ट्रीय प्रदर्शन साकारताना








मायमराठीकडे *गांधीतीर्थ* उभारणाऱ्यांचं दुर्लक्ष झालंय. तरीही प्रदर्शनातले *जालियनवाला बाग हत्याकांड, चौरीचौरा पोलीस चौकी जाळपोळ* यांसारखे अनेक प्रसंग अंगावर काटा उभा करतात.

ख्यातनाम शिल्पकार सदाशिवराव साठे व राम सुतार यांनी साकारलेली गांधीजींची शिल्पं हेसुद्धा 'गांधीतीर्थ'चं वैशिष्ट्य आहे. या दोन्ही शिल्पकारांनी साकारलेल्या शिल्पांतून गांधीजींचं व्यक्तिमत्त्व खरोखरच दर्शकाला मोहून घेतं. चित्रकार मनोजकुमार साकळे यांनी चितारलेलं १५-२० फुटांचं *म्यूरल पेंटिंग*सुद्धा खूपच सुंदर झालंय. चारकोल आऊटलायनिंग व *ॲक्रॅलिक* रंगांनी साकारलेलं त्यांचं पेंटिंग गांधीजी आणि लहान मुलं यांच्यातील निष्पाप भाव प्रगट करण्यात कमालीचं यशस्वी ठरलंय. याशिवाय गांधीजींच्या जीवनातील अनेक प्रसंगांची छायाचित्रं मांडणारं एक दालनही या प्रदर्शनात आहे. या दालनात गांधीजींची अक्षरशः हजारो छायाचित्रं एकाच ठिकाणी आपल्याला पाहायला मिळतात. गांधीजींचं संपूर्ण जीवन व *भारतीय स्वातंत्र्य लढा* यांचं प्रत्ययकारी दर्शन घडवण्यात हे प्रदर्शन कमालीचं यशस्वी ठरलंय.

गांधीजींशी संबंधित सर्व साहित्य-सामग्री या 'गांधीतीर्थ'मध्ये अत्यंत आकर्षक पद्धतीने मांडण्यात आली आहे. संचालक अशोक जैन यांनी 'गांधीतीर्थ'मधील गांधीजींच्या वस्तूंविषयी अत्यंत सविस्तर माहिती *चित्रलेखा*ला दिली.

**गांधीजींची ग्रंथसंपदा**

महात्मा गांधीजींशी संबंधित असलेलं सर्व साहित्य 'गांधीतीर्थ'मध्ये अभ्यासकांना उपलब्ध असायला हवं, अशी भंवरलालजी जैन यांची इच्छा आहे. त्यासाठीच संपूर्ण गांधीसाहित्याला एकत्र करण्याचा उपक्रम *फाऊंडेशन*ने हाती घेतला. या उपक्रमांतर्गत गांधीजींनी लिहिलेल्या



गांधीजींच्या हस्ताक्षरातील पत्रं, जालियनवाला बाग हत्याकांडाचा चित्तथरारक अनुभव देणारी कलाकृती व भिंतीवरील पोस्टर्सद्वारे इतिहासाचं एक नवं दालन 'गांधीतीर्थ'मध्ये खुलं झालंय. गांधीजींनी प्रत्यक्ष वापरलेल्या चपला, आंघोळीचा दगड आदी वस्तूही इथे पाहायला मिळतात.

सर्व पुस्तकांच्या पहिल्या आवृत्तीची प्रत मिळवण्यात आली आहे. गांधीजींनी जी पुस्तकं वाचली, ज्या पुस्तकांचा प्रभाव त्यांच्यावर पडला ती पुस्तकंही इथे उपलब्ध आहेत. आतापर्यंत अशी ९७ पुस्तकं जमा करण्यात आली आहेत.

ज्या पुस्तकांच्या वा अंकांच्या प्रती आज उपलब्ध नाहीत; ती पुस्तकं वाचनालयांमधून मिळवून ती *स्कॅन* करून त्यांची *डिजिटल प्रिंट* इथे ठेवण्यात आली आहे. *गुजरात विद्यापीठ, नवजीवन प्रकाशन, हिंदुस्थानी साहित्य सभा-दिल्ली, गांधी विचार परिषद-वर्धा, गीता ज्ञान मंदिर, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी-पुणे, गांधी तत्त्वज्ञान मंदिर-धुळे* अशा अनेक संस्थांकडून ही पुस्तकं मिळवण्यात आली. उदय महाजन या गांधीविचारांच्या अभ्यासकाने ही ग्रंथसंपदा जमा करण्यासाठी विशेष मेहनत घेतली आहे.

गांधीजींनी प्रकाशित केलेली *हरिजन, नवजीवन, यंग इंडिया* या नियतकालिकांसोबतच त्यांच्या कार्याचा प्रसार करणारी *सर्वोदय, भूदानयज्ञ, इंडियन सोशल रिफॉर्मर* यांसारखी इतर समकालीन नियतकालिकंही इथे उपलब्ध आहेत. तसंच आजही गांधीजींच्या विचार-प्रसाराचं कार्य करणारी तब्बल ३६ नियतकालिकं इथे नियमित उपलब्ध असणार आहेत.

'गांधीतीर्थ' हे गांधीजींच्या विचारांच्या

अभ्यासाचं आंतरराष्ट्रीय केंद्र असल्यामुळे इथे गांधीजींवरील सर्वच भाषांतील म्हणजे मराठीतील ६७४ पुस्तकं, गुजरातीतील १,३२१ पुस्तकं, हिंदीतील २,००८ पुस्तकं, इंग्रजीतील २,९६० पुस्तकं, इतर भारतीय भाषांतील १३७ तर परदेशी भाषांतील ४० अशी एकूण मिळून तब्बल ७,१४० पुस्तकं अभ्यासकांसाठी उपलब्ध आहेत.

गांधीजींचे उत्तराधिकारी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आचार्य विनोबा भावे यांचीही मराठी, गुजराती, हिंदी व इंग्रजीतील सर्वच्या सर्व २५२ पुस्तकं तसंच त्यांच्यावर इतर लेखकांनी लिहिलेली ७६० पुस्तकंही 'गांधीतीर्थ'मध्ये आहेत.


**गांधीविचारांचा शैक्षणिक अभ्यासक्रम**

गांधीजींचे विचार तरुणांपर्यंत पोहोचवायचे असतील, तर शालेय जीवनापासूनच गांधीविचारांशी त्यांची ओळख करून द्यायला हवी. तरच गांधीजींचे विचार खऱ्या अर्थाने देशभर पोहोचतील. यासाठी खूप काम करावं लागेल. यासंदर्भात अशोक जैन म्हणाले, 'यासाठी देशभरात– काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत जे गांधीवादी आहेत, त्यांच्या माध्यमातून गांधीजींचा विचार सर्वत्र नेण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत. आज आमच्याकडे पैसा आहे म्हणून आम्ही हे करतोय, असं कुणालाही वाटेल. पण हे सत्य नाही. खरं तर, सामाजिक कर्तव्य म्हणून गांधीविचार एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित व्हायला हवा, हीच एकमेव भावना या संपूर्ण कार्यामागे आहे.'

'गांधीतीर्थ' हे गांधीजींच्या विचारांचं एक आंतरराष्ट्रीय पातळीवर संशोधन केंद्र म्हणून ओळखलं जावं, यासाठी येथील अभ्यासक्रमांची रचना अत्यंत विचारपूर्वक करण्यात आल्याचं अशोक जैन यांनी सांगितलं. 'खुद्द महात्मा गांधीजींनी स्थापन केलेल्या *गुजरात विद्यापीठा*शी शैक्षणिक सहकार्याचा करार करण्यात आला आहे. गांधीजींचे सहकारी महादेवभाई देसाई यांचे ९१ वर्षीय सुपुत्र नारायणभाई देसाई या विद्यापीठाचे *कुलपती* आहेत. त्याचप्रमाणे जळगावमधील *उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ* व अमेरिकेतील *सायट्स युनिव्हर्सिटी* यांच्याशीही शैक्षणिक सहकार्याचा करार करण्यात आला आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून म्हणजे जुलै २०१२पासून प्रत्यक्ष शैक्षणिक अभ्यासक्रमांना सुरुवात होणार आहे. गांधीविचारांचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम, पदविका अभ्यासक्रम, पदवी अभ्यासक्रम, पदव्युत्तर अभ्यासक्रम, *एम.फील.* संशोधन अभ्यासक्रम, *पीएचडी.* संशोधन अभ्यासक्रम आदी अनेक अभ्यासक्रमांच्या माध्यमातून पुढच्या पिढीला गांधीविचारांची ओळख व बदलत्या जगात गांधीविचारांचं महत्त्व काय यासाठी संशोधन करण्यासाठी प्रेरित केलं जाणार आहे,' असंही अशोक जैन यांनी सांगितलं.

'गांधीतीर्थ'मध्ये गांधीविचारांचा अभ्यास करणाऱ्यांना *कॉर्पोरेट सोशल*

## सच्चा गांधीवादी उद्योगसमूह



अशोक जैन

गांधीवादी आणि *उद्योजक* हे दोन शब्द परस्परविरोधी असले, तरी भंवरलाल जैन यांनी मात्र या दोन्ही शब्दांची सांगड आपल्या प्रत्यक्ष कृतीतून घालून दाखवली आहे. *जैन इरिगेशन, एनर्जी पार्क, प्लास्टिक पार्क, फूड प्रोसेसिंग* अशा नानाविध उद्योगांमध्ये विस्तारलेला *जैन समूह* निसर्गाची नासाडी करून नव्हे; तर निसर्गाशीच व्यावसायिक भागीदारी करून, साकारून दाखवण्याची किमया भंवरलालजी यांनी करून दाखवली आहे. केवळ सात हजार रुपयांच्या भांडवलावर रॉकेल, क्रूड ऑईल, ट्रॅक्टर व कृषी उत्पादनांची विक्री करत सुरु केलेला हा व्यवसाय आज तब्बल पाच हजार कोटी रुपयांच्या घरात पोहोचला आहे. स्वत:च्या संपूर्ण संपत्तीचा ट्रस्ट भंवरलालजी यांनी स्थापन करून आपण केवळ बोलण्यापुरते नव्हे, तर प्रत्यक्षात कृती करूनही गांधीवादी असल्याचं सिद्ध केलंय.

*जैन उद्योग समूहात* काम करणारा प्रत्येक माणूस हा स्वत: मालक असल्याची भावना त्यांनी रुजवली. सर्व कर्मचाऱ्यांना ते आपले सहकारी मानतात. एवढं प्रचंड औद्योगिक साम्राज्य असूनही *जैन उद्योग समूहात* कुणीही कुणाचा बॉस नाही. एखाद्याच्या कामावर नजर ठेवायला कुणी *सुपरवायझर* नाही. प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून स्वत:चं कर्तव्य पार पाडायला हवं, अशी त्यामागची भूमिका आहे. *मी मालक आहे, माझं वर्तन मालकासारखं आहे का?* हे वाक्य लिहिलेले फलक प्रत्येक जैन प्लांटमध्ये लावलेले आहेत. याविषयी सांगताना भंवरलालजी म्हणाले, 'मॅनेजरपासून चपराशापर्यंत सर्वांना आपापल्या जबाबदारीचं भान असायला हवं. आपण नेमकं काय करतो आहोत, कुणासाठी करतो आहोत, त्यातून काय निर्माण होणार आहे, हे जर प्रत्येकाला नीट कळलं, तर तो मनापासूनच काम करणार!'

**जळगाव सोडणार नाही!**

जळगावच्या भूमीशी भंवरलालजींचं पक्कं नातं आहे. भूमीशी असलेला हा त्यांच्या जिव्हाळा त्यांच्या पुढच्या पिढीतही उतरला आहे. हजारो कोटींची उलाढाल करूनही *जैन ग्रुप* जळगावबाहेर न पडल्याचं कारण सांगताना भंवरलाल म्हणाले, 'आम्ही आज केवळ खान्देश, महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशपातळीवर काम करत आहोत. देशात तसंच परदेशातही अनेक ठिकाणी आमचे प्रकल्प कार्यरत आहेत. पण जळगाव सोडून जायचा विचार आमच्या मनातही येत नाही. मुंबई–दिल्लीत किंवा परदेशात एखाद्या ऑफिसमध्ये बसणं आणि तिथून व्यावसायिक सूत्रं हलवणं आम्हाला सहज शक्य आहे. पण नाही. आम्ही जळगावमध्ये बसूनच अख्ख्या जगाला सेवा पुरवणार. वाटलं तर जगाने जळगावमध्ये यावं, पण आमची मुळं सोडून आम्ही बाहेर कुठेही जाणार नाही.'

*रिस्पॉन्सिबिलिटी*च्या अंतर्गत अनेक कंपन्यांमध्ये नोकरीची चांगली संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. 'त्यामुळे त्यांच्या नोकरीचा प्रश्न व गांधीविचारांचा *कॉर्पोरेट* जगतात प्रसार या दोन्ही गोष्टी साध्य होतील,' असं अशोक जैन यांचं म्हणणं आहे.


विशेष म्हणजे, इथे येऊन गांधीविचारांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थी व संशोधकांच्या निवासाची सोयही करण्यात आली आहे. निवासाची ही सोय आंतरराष्ट्रीय दर्जाची असून ऊर्जेचा कमी वापर करणाऱ्या पर्यावरणस्नेही पद्धतीचा अवलंब या निवासस्थानांच्या निर्मितीत केला गेला आहे.

**गांधीसंग्रहालय**

*गांधींसारखा हाडामासाचा एक माणूस या पृथ्वीवर होऊन गेला यावर पुढच्या पिढीचा विश्वास बसणार नाही,* असं सुप्रसिद्ध वैज्ञानिक आईनस्टाइन यांनी म्हटल्याचं प्रसिद्ध आहे. हे लक्षात घेऊन 'गांधीतीर्थ'मध्ये गांधीजींशी संबंधित सर्व साधनसामग्रीचं जतन करण्यात येणार आहे. गांधीजी व विनोबांचं प्रकाशित-अप्रकाशित साहित्य, ऑडिओ-व्हिडीओ, छायाचित्रं, दस्तावेज, तिकीट, लिफाफे, नाणी, नोटा यांचा त्यात समावेश आहे. 'गांधीजींच्या या वस्तू पाहून विद्यार्थ्यांच्या मनात त्यांच्याविषयी श्रद्धाभाव निर्माण होईल व गांधीविचारांच्या अभ्यासात त्यांची रुची वाढेल,' असा विश्वास भंवरलाल जैन यांना वाटतो.

**दस्तावेज**– गांधीजी नेहमी काहीना काहीतरी लिहीत असत. त्यातील बहुतेक लेखनाचा संग्रह संपूर्ण गांधी वाङ्मयात केला गेला आहे. तरीही आज त्यांचे अनेक दस्तावेज किंवा कागदपत्रं अशी आहेत जी इतस्तत: विखुरलेली आहेत. अशा सर्व कागदपत्रांना एकत्र करण्याचं कार्य सध्या सुरू आहे. आतापर्यंत गांधीजींशी संबंधित अशा ३२,४४८ पृष्ठांचा संग्रह करण्यात आला आहे. सोबत गांधीजींचे सहकारी महादेवभाई देसाई व मनुबेन यांच्या मूळ डायरींच्या रंगीत *स्कॅन* केलेल्या प्रती इथे उपलब्ध आहेत.

**छायाचित्र**– गांधीजींनी त्यांच्या आयुष्यात अनेक उपक्रम, आंदोलनं तसंच कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. अनेक महत्त्वाच्या व्यक्तींना ते भेटले. हजारो सभांमध्ये भाषणं केली. अशा अनेक प्रसंगांतील त्यांच्या तब्बल



# खान्देश बनला केळ्यांचं आगर

केळ्यांचं आगर म्हणून जळगावची ओळख बनली, ती *जैन इरिगेशन सिस्टिम्स ग्रुप*मुळेच. भंवरलालजी जैन यांनी ठिबक सिंचनाच्या माध्यमातून कमी पाण्यातही चांगली शेती करता येते, हे दाखवून दिलं. पण आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करत त्यांनी खान्देश-जळगावचा अक्षरशः कायापालट केला. आज *जैन ग्रुप*ची *ऊती संवर्धित* (टिश्यू कल्चर) केळ्यांची प्रयोगशाळा ही देशातील प्रथम क्रमांकाची प्रयोगशाळा म्हणून ओळखली जाते. *जैन ग्रुप*च्या केळी विभागाचे केळीतज्ज्ञ के.बी. पाटील व डॉ.अनिल पाटील यांनी याविषयी माहिती दिली.

या माहितीनुसार, १९८५-९०च्या कालखंडापर्यंत देशभरात सर्वत्र केळ्यांची लागवड ही पारंपरिक पद्धतीने *बसराई* व *श्रीमंती* या पारंपरिक वाणांचे कंद पेरून केली जात असे. पाटपाणी पद्धत व हाताने खतं टाकण्याचा तो काळ होता. एका पिकाला १८ महिने लागायचे. तेव्हा राज्याची केळी उत्पादकता होती २४ मेट्रिक टन प्रति हेक्टर, तर देशातील केळी उत्पादनातला वाटा होता १० टक्के. जगात सर्वाधिक केळी उत्पादन करूनही गुणवत्ता व आंतरराष्ट्रीय मानकांच्या अभावी त्यावेळी भारतीय केळी अजिबात निर्यात होत नव्हती.

पण *ठिबक सिंचना*चा अवलंब, फर्टिगेशन अर्थात ठिबक सिंचनाद्वारे खतपुरवठा व *ग्रॅण्ड ९* ऊती संवर्धित केळ्यांची रोपं यांचा वापर केल्याने केळी उत्पादनात प्रचंड वाढ झाली. पिकाचा कालावधी १२ महिन्यांवर आला व आज राज्याची उत्पादकता तब्बल ७० मेट्रिक टन प्रति हेक्टर इतकी वाढली. *ग्रॅण्ड ९* हे वाण, ठिबक सिंचन व फर्टिगेशन आणि काढणीपूर्व व काढणीनंतर तंत्रज्ञान या नव्या आधुनिक मॉडेललाच आज *जैन मॉडेल* म्हणून ओळखलं जातं. याच मॉडेलचा अवलंब खान्देशातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात केला व आपली उत्पादकता वाढवली. देशातील सर्वाधिक केळी उत्पादन आज खान्देश पट्ट्यात होतं. जगाच्या बाजारपेठेचे दरवाजे भारतीय केळी उत्पादकांना उघडले आणि निर्यात सुरू झाली. आज जगातील एकूण केळी उत्पादनात भारताचा वाटा २१ टक्के, तर महाराष्ट्राचा देशातील उत्पादनाचा वाटा १९ टक्के झाला आहे.

गेल्या वर्षभरात *जैन ग्रुप*च्या केळी विभागाने तीन कोटी ऊती संवर्धित केळ्यांच्या रोपट्यांची विक्री केली. 'शेतकऱ्यांकडून वाढलेल्या मागणीमुळे पुढच्या वर्षभरात हा आकडा सहा कोटींपेक्षाही अधिक असणार आहे,' असं डॉ.अनिल पाटील यांनी सांगितलं. ऊती संवर्धित ऊस, बटाटा, कांदा यांची रोपटीही जैन प्रयोगशाळेमार्फत शेतकऱ्यांना विकली जातात. ऊती संवर्धित डाळिंबाची रोपटी फक्त *जैन ग्रुप*च विकसित करू शकला आहे, हे आणखी एक विशेष.



मनोजकुमार साकळे

**या चित्रकाराने साकारलेलं गांधीजींचं म्यूरल पेंटिंग सुरेख आहे. अशा अनेक चित्रकार-शिल्पकार-कलाकारांचा 'गांधीतीर्थ' उभारण्यात मोलाचा वाटा आहे.**



४,०१९ छायाचित्रांचं संकलन 'गांधीतीर्थ'मध्ये करण्यात आलं आहे. टेलिफोनवर बोलणारे गांधीजी, कुष्ठरोगाचा विषाणू *मायक्रोस्कोप*मधून पाहणारे गांधीजी, थट्टा-मस्करी करणारे गांधीजी या फोटोंतून आपल्याला पाहायला मिळतात.

**फिल्म आणि भाषण-** गांधीजींना अनेक कार्यक्रमांना अध्यक्ष किंवा प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित केलं जात असे. यानिमित्ताने गांधीजींनी अनेक भाषणं केली. त्यातील काही भाषणांचे व्हिडिओ 'गांधीतीर्थ'मध्ये आहेत. गांधीजींच्या मूळ आवाजातील १५२ भाषणं ऐकण्याची-पाहाण्याची संधी त्यामुळे इथे मिळू शकते. त्याचप्रमाणे गांधीजींचं जीवन व कार्य यावर आधारित १५ मिनिटांपासून ते साडेपाच तासांपर्यंतच्या ७० *डीव्हीडीं*चं संकलन करण्यात आलं आहे. यांमध्ये इंग्रजीतील ४४, हिंदीतील २५, मराठीतील एक व कोरियन भाषेतील एक *डीव्हीडी*चा समावेश आहे.


**टपाल तिकीट-** महात्मा गांधी हे भारताचे *राष्ट्रपिता* म्हणून ओळखले जात असले, तरी त्यांच्या विचारांमुळे प्रेरित झालेल्या अनेक राजकीय कार्यकर्त्यांनी आपापल्या देशात अहिंसक स्वातंत्र्य चळवळ उभारली. सत्याग्रह व अहिंसक आंदोलनांचा वापर अनेक चळवळींनी केला. त्याचाच परिणाम म्हणून आज जगभरातील सुमारे १५० देशांनी गांधीजींवर टपाल तिकीट प्रकाशित केलं आहे. आतापर्यंत त्यातील ११४ देशांनी प्रकाशित केलेली टपाल तिकिटं 'गांधीतीर्थ'मध्ये संग्रहित करण्यात आली आहेत.

**गांधीजींच्या वापरातील वस्तू-** *काँग्रेस*ची सर्व अधिवेशनं गावांमध्ये व्हायला हवीत, असा गांधीजींचा आग्रह होता. त्यानुसार काँग्रेसचं गावात झालेलं पहिलं अधिवेशन खान्देशातल्या फैजपूरमध्ये भरलं होतं. डिसेंबर १९३६मध्ये झालेल्या या अधिवेशनाचे अध्यक्ष गांधीजी होते. याप्रसंगी गांधीजींना घालण्यात आलेला खादीसुताचा हार, चप्पल व आंघोळीचा दगड आदि साहित्यसुद्धा 'गांधीतीर्थ'मध्ये आहे.

अत्यंत भव्य असं 'गांधीतीर्थ' संपूर्णपणे अनुभवायला किमान अख्खा एक दिवस लागेल इतकं ते भव्य आहे. ते पाहाण्यासाठी दर्शकांना-पर्यटकांना नाममात्र शुल्क आकारण्यात येणार आहे. रविवार २५ मार्च रोजी देशाच्या राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते 'गांधीतीर्थ'चं उदघाटन होणार आहे. 'गांधीविचारांचं आंतरराष्ट्रीय पातळीवरील हे संशोधन केंद्र व प्रदर्शन आजच्या अशांतता, कोलाहल व हिंसकतेने भरलेल्या जगाला अहिंसा व शांततेचा मार्ग दाखवण्याचा प्रयत्न करेल,' अशी भवरलालजी जैन यांना आशा आहे. त्यांची ही आशा सफल संपूर्ण होवो.

■ फोटोः राजेंद्र माळी, ईश्वर राणा, राजू हरिमकर

## सामाजिक कार्यासाठी पाच टक्के नफा



कृषी उद्योगातून मिळालेल्या नफ्याचा वापर अधिकाधिक प्रमाणात सामाजिक कार्यासाठी व्हावा याकडे *जैन ग्रुप*चा कटाक्ष आहे. त्यासाठी एक स्वतंत्र विभागच स्थापन करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती देताना *जैन इरिगेशनच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी* विभागाचे प्रमुख **विनोद रापतवार** म्हणाले, 'व्यावसायिक नफ्यातील पाच टक्के रक्कम ही कायमच सामाजिक कार्यासाठी वापरली जाते. याअंतर्गत शेतकऱ्यांपासून सर्वसामान्य नागरिकांसाठी प्रबोधनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. *जैन गुरुकुल*च्या माध्यमातून तर शेतकरी, कृषी विद्यार्थी तसंच राजकीय व सामाजिक कार्यकर्ते यांना कृषीविषयक मार्गदर्शन करणाऱ्या कार्यशाळा नियमित आयोजित केल्या जातात.'